उद्योजनाचे प्रथम :- श्री. शिल्पा फुगासे ⑥

①

# अनाथ झाला नाथ

23 डिसेंबर 2017 ची सुखद रम्य संध्याकाळ. षण्मुखानंद हॉल माणसांनी फुलून गेला होता. राजकारण, विज्ञान, वैद्यकीय, कला, क्रीडा अशा अनेक क्षेत्रांतील दिग्गज मंडळी स्थानापन्न झाली होती. सगळीकडे उत्साहाच वातावरण होतं. मंद संगीताच्या सुरांनी आसमंत भारावून गेलं होतं. कार्यक्रमही तसाच खास होता. महाराष्ट्रातील दहा युवक, युवतींना शासनातर्फे "युवाशक्ती" हा पुरस्कार मिळणार होता. तोही माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते.

या दहा जणांमधील प्रत्येकाने काहीतरी भव्यदिव्य काम केलं होतं. कुणी शेतीसाठी काही ठोस शोध लावले होते, तर कुणी कचरा व्यवस्थापनासाठी काम करत होतं, कुणी काश्मीर-मधील मुलामुलींच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली होती, कुणी नदीतील गाळ काढून पाण्याची पातळी कशी वाढवता येईल यासाठी झटत होतं. प्रत्येक-जण आपण समाजाचं काहीतरी देणं लागतो या भावनेने काम करत होते. करताना कुठल्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता. उलट बऱ्याचदा आपलीच गंगाजळी घालावी लागत होती. घरच्यांचा रोष पत्करावा लागत होता.

आज त्यांचा मानसन्मान होणार होता, सत्कार होणार होता. कदाचित शासनाकडून आर्थिक मदत मिळून त्यांच्या कामात मदत होणार होती. ते आणखी जोमाने काम करू शकणार होते. तर असे हे दहाजण पहिल्याच रांगेत विराजमान झाले होते. सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद होता. जरी कुठल्याही अपेक्षेने ते काम करत नव्हते, तरीसुद्धा शासन-दरबारी आपल्या कामाची दखल घेतली जातेय, चार लोकांपर्यंत आपलं काम पोचतंय याचं समाधान नक्कीच होतं.

PTO

Scanned with OKEN Scanner

विशाल सुद्धा त्या दहाजणांमधेच होता. तोही छान तयार होऊन आला होता. फिक्या निळ्या शर्टवर गडद रंगाचं जॅकेट अगदी खुलून दिसत होतं. अगदी राजबिंडा दिसत होता. त्याला साथ देणारी त्याची पत्नी निवेदिता त्याच्याबरोबर होती. तिचा ऊर अभिमानाने भरून गेला होता. विशालच्या चेहऱ्यावर अतीव समाधान विलसत होतं.

व्यासपीठ फिक्या रंगीत फुलांच्या रंगसंगतीने अतिशय रसिकतेने सजवलं होतं. एक सुंदर निवेदिका व्यासपीठावर आली आणि तिच्या गोड स्वरात स्वागत समारंभाला सुरुवात झाली.

विशालच्या डोळ्यासमोर मात्र एक पाच सहा वर्षांचा गोजिरवाणा भुकेलेला मुलगा उभा राहिला. अनाथाश्रमामधे आता कधी खायला मिळेल याची तो वाट बघत होता. एक जाडी भरडी भाकरी आणि तिखट जाळ भाजी त्याच्यासमोर आली. ती निमूटपणे खाण्याशिवाय त्याच्यापुढे काही पर्यायच नव्हता. आता दीड वाजता खाल्ल्यावर रात्रीच्या जेवणापर्यंत त्याला काहीच मिळणार नव्हतं. हे असं रोजचंच. ~~अनाथ~~ अनाथाश्रमातील मुलांसाठी दोन वेळचं जेवण आणि डोक्यावर छप्पर हीच अस्तित्वासाठीची लढाई होती. त्यांची आवडनिवड कोण जपणार ? शासकीय अनाथ आश्रमातले पगार घेऊन काम करणारे कर्मचारी पाट्या टाकल्यासारखे काम करत होते. अनेक लहान मोठी मुलं, मुली त्या आश्रमात रहात होती. आणि तिथले कर्मचारी उपकार केल्यासारखे त्यांच्याशी वागत होते. त्या मुलांना दुसरा पर्यायच कुठे होता ?

शासनाच्या नियमाप्रमाणे तो मुलगा सहा वर्षांचा झाल्यावर शाळेत जाऊ लागला. त्याला अभ्यासाची गोडी लागली. तो हुशार होता. नेहमी पहिल्या तीन नंबरांत त्याचा नंबर असे. पण शाळेत गेल्यावर तो अधिकच दुःखी झाला. इतर मुलांचे आईवडील, त्यांचं त्यांच्या मुलांवरचं प्रेम, ती आनंदी मुलं हे सगळं त्याच्या चाणाक्ष नजरेतून सुटलं नाही. त्यांच्या डब्यात यानी कधीच न बघितलेले पदार्थ असायचे. माझं कोणीच कसं नाही, या विचाराने तो निराश व्हायचा. शाळेतला

शिक्षकांनाही या मुलांशी वागताना दयामाया दाखवण्याची गरज वाटत नसे. या मुलांची बाजू घेऊन त्यांना विचारायला कोण येणार होतं? एकदा जेवल्यानंतर रात्रीपर्यंत काहीही खायला मिळत नसे. त्यामुळे बरोबरची काही मुलं बिचारी खाण्यासाठी चोऱ्या माऱ्या करत पण त्याने कधीच तो मार्ग स्वीकारला नाही.

माही म्हणायला दरवर्षी त्याच्या वाढदिवसाला त्याचे डीकुन्हा आजोबा त्याला भेटायला यायचे. काहीतरी खाऊ घेऊन यायचे आणि त्याच्याशी थोडा वेळ बोलून निघून जायचे. हळूहळू तो मोठा होऊ लागला. त्याला कायम प्रश्न पडू लागले. आपले आईबाबा कोण आहेत? कुठे आहेत? का नाही ते आपल्याला भेटायला येत? का नाही ते आपल्याला घरी घेऊन जात? पण बिचाऱ्याला याबद्दल आजोबांना कधी विचारायचं धाडस झालं नाही आणि आजोबांनीही कधी त्याला सांगितलं नाही.

अनाथाश्रमातील इतर मुलंच त्याचे सगेसोयरे होते. त्यांच्या सहवासात दिवस ढकलले जात होते. तिथे त्याच्याहून मोठी असलेली निशा त्याची ताई झाली होती. निशा छोट्या भावासारखं त्याच्यावर प्रेम करत होती. त्यालाही तिचा आधार होता. पण निशा १८ वर्षांची झाली आणि तिच्यावर अनाथाश्रम सोडायची वेळ आली. तसा कायदाच होता. १८ वर्षांनंतर मुलं तिथे राहूच शकत नव्हती. त्याचा आधारच तुटला. आधीच तो अबोल, शांत होता. आता आणखीनच गप्प गप्प होऊन गेला.

खरंच कसं जगत असतील ही अनाथ मुलं? १८ वर्षांपर्यंत जिवंत राहण्यापुरतं अन्न आणि पाठ टेकण्यापुरता निवारा. १८ वर्षं पूर्ण झाली की अनाथाश्रमातून बाहेर पडायचं. हातात शिक्षण नाही, पैसा नाही, राहायला घर नाही, जगाचा अनुभव नाही, भारताचे नागरिक असल्याचा साधा पुरावाही नाही. कशी जगणार ही १८ वर्षांची मुलं बाहेरच्या जगात? काय हा निर्दयी कायदा? मग काय? काही बिचारी पोटापाण्यासाठी वाईट मार्गाला लागतात. समाज त्यांना

PTO

चोर, मवाली म्हणून ओळखायला लागतो. मुलींचे हाल तर विचारुच नका. त्यांचं अक्षरश: कोणाशीही लग्न लावून दिलं जातं. नाहीतर असतोच वेश्या व्यवसाय, पाचवीला पुजलेला. त्याला काही अपवाद असतील, पण अगदी थोडे.

विशालच्या मनातून हे विचार काही जात नव्हते. तो शरीराने तिथे होता, पण मन भरकटलं होतं.

होता होता तो मुलगा सोळा वर्षांचा झाला. दहावीची परीक्षा दिली. खूप चांगल्या मार्कांनी पास झाला. पण पुढे काय? मोठ्ठं प्रश्नचिन्ह होतं. त्याचा रिझल्ट लागल्यावर आजोबा त्याला भेटायला आले. त्या दिवशी ते काहीतरी ठरवूनच आले होते. त्यांचा चेहरा कसनुसा झाला होता. त्याला सगळं कसं सांगावं या संभ्रमात होते. ते त्याला बाहेर घेऊन गेले. आणि त्यांनी जे काही सांगितलं ते ऐकून त्या सोळा वर्षाच्या कोवळ्या मुलाचा अक्षरश: थरकाप उडाला. एक भयानक सत्य त्याच्या समोर आलं. कसा सामोरा जाणार होता तो या सत्य घटनेला?

त्याच्या आईवडिलांनी घरच्यांच्या विरोधात जाऊन लग्न केलं होतं. विरोध कशासाठी तर धर्म वेगळा म्हणून. ते दोघेही इंजिनियरींग कॉलेज मध्ये एकत्र होते. तिथे मैत्री झाली, प्रेमात पडले. दोघेही इंजिनिअर झाले. पण घरच्यांचा विरोध. अगदी प्रचंड विरोध. शेवटी पळून जाऊन लग्न केलं. त्यांना एक गोड मुलगा झाला. त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नव्हता. तो दोन वर्षांचा झाला पण नियतीने काहीतरी भलतंच त्यांच्यासमोर वाढून ठेवलं होतं. ते दोघे स्कूटरवरुन जात असताना चक्क गोळ्या घालून त्यांची हत्या करण्यात आली. एवढी क्रूर शिक्षा? तो मुलगा त्यावेळी त्यांच्याबरोबर नव्हता, त्याला जीवनदान मिळालं. नियतीलाच त्याच्या हातून काहीतरी मोठ्ठं काम करुन घ्यायचं होतं का? पण तो अनाथ म्हणून अनाथाश्रमात आला. ह्या दुर्दैवाला काय म्हणावं?

तो सून्न झाला होता. काय काय विचार त्याच्या

PTO

मनात आले असतील? त्या कोवळ्या मनावर केवढा आघात झाला असेल?

व्यासपीठावर माननीय अतिथींची भाषणं चालू होती. विशाल ती ऐकत तर होता. पण मनापर्यंत काहीच पोचत नव्हतं.

सुन्न झालेला तो मुलगा त्याच्या डोळ्यासमोरुन हलत नव्हता. पण यातून एक चांगली गोष्ट झाली. त्या मुलाला आपल्या आईवडिलांबद्दल प्रचंड अभिमान वाटला. प्रेम दाटून आलं. आणि त्यानी ठरवलं की मीही त्यांच्यासारखाच इंजिनिअर होणार, कितीही कष्ट करावे लागले तरी बेहत्तर.

अनाथाश्रमातून कॉलेजमधलं शिक्षण मिळणारच नव्हतं, दोन वर्ष फुकटच गेली. १८ वर्ष पूर्ण झाल्यावर त्याला अनाथाश्रमातून बाहेर पडावंच लागलं. रहायला जागा नाही, हातात पैसे नाहीत, काय करणार? कसं शिक्षण घेणार? जीवनमरणाचा प्रश्न होता. तो १४ महिने प्लॅटफॉर्मवर राहिला. मिळेल ते काम केलं. थोडे पैसे जमवले. कुठून मदत मिळते का ते शोधत राहिला. त्यानंतर एका वसतिगृहात त्याला आसरा मिळाला. अनेक लोकांकडे मदतीसाठी हात पसरला. सगळीकडून नकारघंटा येत होती. तरी त्याने हार मानली नाही. प्रयत्नांची पराकाष्ठा केली. शेवटी एका प्राध्यापकांना त्याची तळमळ कळली. थोडीफार मदत मिळाली. दहावीच्या मार्कांवर कॉलेजमधे प्रवेश मिळाला. मग मात्र त्याने मागे वळून पाहिले नाही. बारावी चांगल्या मार्कांनी पास झाला, त्यामुळे पुढेही मदत मिळत राहिली. इंजिनिअरींगला प्रवेश मिळाला. अर्थात सहजासहजी नाहीच. खूप कष्ट करुन इंजिनिअर झाला. त्याला एका उत्तम कंपनीमधे नोकरीही मिळाली.

इंजिनीअरींग कॉलेजमधे त्याची दिप्तीशी ओळख झाली. मैत्रीचं रुपांतर प्रेमात झालं. दिप्तीच्या घरीही त्याच्या कर्तृत्वामुळे त्याच्या भूतकाळासकट त्याचं स्वागतच झालं. सगळं काही स्वप्नवत चाललं होतं.

PTO

एकदा तो खूप सारी मिठाई घेऊन दिवाळीला अनाथाश्रमात गेला. तिथे त्याला कळले की त्याच्याबरोबर दहावीला चांगले मार्कस् मिळवणारे त्याचे मित्र, कोणी बूट पॉलीश करतायत, मोलमजूरी करतायत, पाकीटमारी करतायत. मुलींची अवस्था तर फारच वाईट होती. त्याच्या निशाताईचं आयुष्य तर पार उध्वस्त झालं होतं. तो सैरभैर झाला, खूप दु:खी झाला.

त्याची नोकरी, प्रेमप्रकरण चालू होतं. पण सतत अनाथाश्रमातल्या मुलांच्या आठवणीने व्यथित होत असे. ही मुलं बाहेरच्या जगात कशी तग धरुन रहातील? मला मिळेल तशी मदत यांना मिळेल का? मन सतत चिंतेत असे. त्यातच त्याला नोकरीच्या निमित्ताने अमेरिकेला जाण्याची संधी चालून आली. दक्षा आणि तिच्या घरचे तर फारच खूष झाले. पण तो अस्वस्थ होता. मनात चलबिचल चालू होती. एकदा तिकडे गेलं की या मुलांशी काही संबंधच रहाणार नाही. मला काहिच करता येणार नाही. शेवटी त्याने मनाचा कौल ऐकला. अमेरिकेची संधी नाकारुन, इथेच राहून अनाथाश्रमातून १८ वर्षांची जी मुलं बाहेर पडतात त्यांच्यासाठी पूर्ण वेळ काम करायचं असं ठरवले.

दक्षाला त्याची घालमेल कळत होती. ती त्याला साथ द्यायला तयार होती. तिने हे मान्य केलं. पण दक्षाच्या घरच्यांना हे अजिबातच मान्य नव्हतं. चांगली संधी सोडून हे काम करणं त्यांना बिलकूल परवडत नव्हतं. दक्षा घरच्यांचा विरोध पत्करुन लग्न करायला तयार होती. पण असं लग्न करणं त्याला अजिबात मान्य नव्हतं. तिच्या प्रेमात आकंठ बुडालेला असून सुद्धा शेवटी तिला विसरुन जायचं असं ठरवले. त्या अनाथ मुलांच्या भविष्यासाठी त्याने आपल्या प्रेमाची आहुति दिली.

आता मी श्रीयुत विशाल राव यांना व्यासपीठावर आमंत्रित करते. निवेदिकेने गोड आवाजात त्याचं नाव पुकारलं. तो एकदम आपल्या तंद्रीतून बाहेर आला आणि व्यासपीठावर गेला. टाळ्यांच्या गजरात

PTO

त्याचं स्वागत होत होतं.

मानननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विशाल राव यांचा सत्कार करण्यात आला. त्याला मानचिन्ह आणि सन्मानपत्र देण्यात आलं. तो अवघडून उभा होता. त्याला अशा सन्मानाची सवय नव्हती.

"आता श्री. विशाल राव यांच्या सन्मानपत्राचे वाचन होईल."

श्रीयुत विशाल राव,

महाराष्ट्र शासनातर्फे हा सुवाशको पुरस्कार देताना आम्हाला अतिशय आनंद होतोय, अभिमान वाटतोय. आपण अनाथाश्रमात वाढलात. अतिशय कष्ट करुन इंजिनीअर झालात. चांगली नोकरी मिळाली, अमेरिकेची संधी चालून आली. पण आपल्या आयुष्याच्या वैयक्तिक भावभावना, लोभ, इच्छा याचा तुम्ही होम केलात. तुमची कथा म्हणजे अत्यंत दु:खातून फिनिक्स पक्षाप्रमाणे झेपावणाऱ्या दुर्दम्य आशावादाची. दु:खितांच्या आसवांना, लाचारीला समर्थ स्वावलंबनाचे जगणे मिळवून देण्याची. तुम्ही अनाथाश्रमातून बाहेर पडणाऱ्या १८ वर्षांच्या अनेक मुलामुलींना आसरा दिलात, मार्गदर्शन केलंत, आणि त्यांचं आयुष्य मार्गी लावलंत. आजही तुमचं हे काम जोमाने चालू आहे. तुम्ही महाराष्ट्राची शान आहात. अनेक शुभेच्छा.

धन्यवाद!

सगळा सभागृह Standing ovation देत होता. इतका वेळ स्वत:कडे त्रयस्थपणे बघणाऱ्या विशालला आता मात्र अश्रू आवरता येत नव्हते....

(सत्य घटनेवर आधारित)